आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता
७ मार्च २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वीज ग्राहकांच्या फायद्यासाठी राज्य सरकार प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेसारखी योजना सुरु करणार, ग्रामीण भागात सिमेंटचे रस्ते बांधण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा
- जनतेच्या कामांमध्ये राजकारण न आणता विकासयात्रेत सहभागी होण्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं विरोधकांना आवाहन
- चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त
- महिला दिनानिमित्त विधीमंडळात विशेष चर्चा

**आणि**

- साहित्य अकादमीचा भाषांतरासाठीचा पुरस्कार सुदर्शन आठवले यांना जाहीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. स्मार्ट मीटर लावणाऱ्या घरगुती ग्राहकांना  दिवसा वापरलेल्या वीजेवर सवलत देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत बांधल्या जाणाऱ्या घरातही सोलर पॅनल लावून देणार असल्याचं ते म्हणाले. राज्य सरकारनं बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करत वीज दरात मोठी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आगामी पाच वर्षांत ग्राहकांना दरवर्षी ९ टक्के दरवाढ सोसावी लागणार नाही, उलट वीज दर २४ टक्क्यांनी कमी होणार आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यात ग्रामीण भागातले 14 हजार किलोमीटरचे रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यात येणार आहे.  तसेच १ हजार लोकसंख्या असलेल्या सुमारे ४ हजार गावांमध्ये सिमेंट काँक्रिटीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येईल, असंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

<><><><><>

राज्यातल्या सर्वसामान्य माणसाचे आयुष्य सुकर करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यामुळं विरोधकांनी जनतेच्या कामांमध्ये राजकारण न आणता विकासयात्रेत सहभागी व्हावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते.

शिवरायांचा, शंभूराजांचा अवमान कधीही सहन केला जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. यावेळी त्यांनी शक्तीपीठ महामार्ग, सोयाबीन खरेदी, औद्योगिक क्षेत्रातली गुंतवणूक यासह विविध मुद्द्यांचा आढावा घेतला.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र ८ पूर्णांक ७ दशांश, सेवा क्षेत्र ७ पूर्णांक ८ दशांश आणि उद्योग क्षेत्र ४ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत आज हा अहवाल मांडला. या आर्थिक वर्षात राज्याचे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे. तर दरडोई उत्पन्न २ लाख ७८ हजार ६८१ रुपयांवरून ११ टक्क्यांनी वाढून ३ लाख ९ हजार ३४० रुपये होण्याचा अंदाज आहे. स्थूल उत्पन्नाचा विचार करता महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असेल. मात्र दरडोई उत्पन्नामध्ये तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू यांच्यानंतर राज्याचा क्रमांक लागतो.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचे महसुली उत्पन्न ४ कोटी ८६ लाख ११६ कोटी रुपये होते. यंदा ते केवळ १३ हजार कोटींनी वाढून सुमारे ५ लाख कोटी रुपये होईल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे. गेल्यावर्षी ५ लाख ५ हजार ६४७ कोटी रुपये असलेला महसूली खर्च यंदा ५ लाख १९ हजार ५१४ कोटी होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि महसुली तूट ४ दशांश टक्के असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शस्त्रबलानं नव्हे तर प्रेमानं सर्वांना आपलंसं केलं असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

जागतिक महिला दिन आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्त विधानसभेत चर्चा झाली, त्यावेळी ते बोलत होते. अतिशय निस्वार्थ भावनेने त्यांनी राज्य केलं आणि लोककल्याणकारी योजना राबवल्या असं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत महिलांची आठवण त्यांनी काढली. २०२९ साली कायदेमंडळात तेहतीस टक्के महिला दिसतील, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

विधानपरिषदेतही यानिमित्त 'महिलांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि सक्षमीकरण ' या विषयावर चर्चा झाली. आपला दृष्टिकोन प्रगल्भ होत नाही तोपर्यंत स्त्री पुरुष समानतेचं युग येणार नाही, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केलं. अनेक यंत्रणा महिलास्नेही होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करणं गरजेचं आहे असं त्या म्हणाल्या. सार्वजनिक सोयी सुविधा अद्ययावत केल्या तरी स्त्रीचा आदर केला असं म्हणता येईल असं विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले. कोणतंही राजकारण न करता सरकारने महिलांना संरक्षण पुरवावं असं ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षांतली विक्रमी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात केवळ नऊ महिन्यात आली असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि देशांतर्गत व्यापार विभागानं डिसेंबर

२०२४ पर्यंतचा परकीय गुंतवणुकीसंदर्भातल्या अहवालात ही माहिती दिली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातल्या पहिल्या ९ महिन्यात आतापर्यंत एकूण १ लाख ३९ हजार ४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या १० वर्षात महाराष्ट्रात एका वर्षात आलेली सर्वाधिक परकीय गुंतवणूक आहे.

**<><><><><>**

साहित्य अकादमीचा मराठी पुस्तकाच्या भाषांतरासाठीचा वर्ष २०२४ चा पुरस्कार सुदर्शन आठवले यांना जाहीर झाला आहे. गुरुचरण दास यांच्या 'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' या मूळ इंग्रजी पुस्तकाचं याच नावाने त्यांनी भाषांतर केलं आहे. मिलिंद म्हामल यांना 'भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा' या नावाने 'आऊटलाइन ऑफ इंडियन फिलॉसॉफी' या मूळ इंग्रजी पुस्तकाचं कोकणीत भाषांतर केल्याबद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ५० हजार रुपये आणि ताम्रपट असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><><>**

महिला-बालकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांसाठी राज्य सरकारनं ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर केले. २०२२-२३ या वर्षांसाठी  कोकण विभागातून नवी मुंबईच्या फुलन शिंदे, पुणे विभागातून जनाबाई उगले, नाशिकमधून अहिल्या नगरच्या डॉक्टर प्राजक्ता कुलकर्णी, छत्रपती संभाजीनगरच्या मिनाक्षी बिराजदार, अमरावतीच्या वनिता अंभोरे आणि नागपूरच्या शालिनी सक्सेना यांना जाहीर झाले आहेत.

<><><><>

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने येत्या मे महिन्यात मुंबईत जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजनाच्या वेव्हज या शिखर परिषदेचं आयोजन होणार आहे. या परिषदेच्या आयोजनाबाबत उद्योग विभागातर्फे आज मुंबईत एका बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीला केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती. येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या परिषदेत चित्रपट, टीव्ही, ब्रॉडकास्ट, प्रिंट, रेडिओ, वृत्तपत्रं, नवीन मीडिया, जाहिरात, ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग, ई-स्पोर्ट्स,  संगीत, लाइव्ह इव्हेंट्स इत्यादी मनोरंजनाशी संबंधित सर्व उद्योग क्षेत्रांवर भर देण्यात येईल, अशी माहिती संजय जाजू यांनी या बैठकीत दिली. या पार्श्वभूमीवर या परिषदेची नियोजनबद्ध तयारी सर्व विभागांनी समन्वयातून करावी अशा सूचना राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिल्या.

<><><><>

धारावी पुनर्विकास प्रकल्पाला स्थगिती द्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. अदानी समूहाला निविदा देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सेकलिंक टेक्नोलॉजी या कंपनीने दाखल केली होती.

<><><><>

जालना जिल्ह्यातल्या वाळू तस्करांनी काल  परतूर इथल्या तहसीलदार प्रतिभा गोरे यांच्या वाहनावर हल्ला केला. याप्रकरणी सहा संशयितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**